पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट क्र. ३९ दिनांक १३/०८/२०२२

# अपहरीत मुलीचा १२ तासाचे आत शोध घेण्यास पालघर पोलीसांना यश

दिनांक १२/०८/२०२२ रोजी १७:५५ वाजेच्या सुमारांस, अपहरीत मुलगी वय वर्षे १२, रा. गुलमोहर अपार्टमेंट, अशोकवन, ता. वाडा येथे रा. कुंर्झे, ता. विक्रमगड, जि. पालघर हि पी. जे. हायस्कुल, वाडा येथुन शाळा सुटल्यानंतर तीचे राहते घरी आली असतांना काही अज्ञात इसमांनी स्वत:च्या फायद्याकरीता सफेद रंगाच्या कारमधून जबरदस्तीने अपहरण केले. सदरबाबत अपहरीत मुलीचे वडील श्री. विश्वास किसन शेलार, वय ३८ वर्ष, यांनी दिले फिर्यादीवरुन वाडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ३१५/२०२२ भा.दं.सं.क. ३६३ प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी तात्काळ घटनास्थळी पोहचून अधिकाऱ्यांना तपासाबाबत मार्गदर्शन केले. श्री प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग, वाडा पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखा यांची वेगवेगळी पथके तयार करुन अपहरीत मुलीचा शोध सुरु केला. सदर अपहरीत मुलीचा शोध घेत असताना मिळालेल्या माहितीच्या आधारे व तांत्रीक पुराव्याच्या आधारे कोणतेही धागेदोरे नसताना कौशल्यपुर्ण तपास करुन १२ तासाच्या आत अपहरण करणारा मुख्य आरोपी वय वर्षे ३० रा. ऐनशेत ता. वाडा जि. पालघर यास ताब्यात घेवून नमुद गुन्ह्याची उकल करण्यात आली आहे. सदर अपहरीत मुलीस फिर्यादी श्री. विश्वास किसन शेलार यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक दशरथ पाटील, प्रभारी अधिकारी वाडा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्री प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर व श्री प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधीकारी जव्हार विभाग, श्री अजय वसावे, प्रभारी अधिकारी स्थागुशा, श्री दशरथ पाटील, प्रभारी अधिकारी वाडा पोलीस ठाणे, सपोनि/विलास जाधव, सपोनि/प्रेमनाथ ढोले, पोउपनि/ढुस, पोउपनि/समिर लोंढे, सर्व नेमणूक वाडा पोलीस ठाणे, पोउपनि/आशिष पाटील, स्थागुशा बोईसर युनिट, तसेच वाडा पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.